**DAYANAND ANGLO VEDIC PUBLIC SCHOOL, AIROLI**
**II PERIODIC SAMPLE PAPER- (2024-25)**
**SUBJECT: MARATHI**

**STD : VII** **MAX MKS:50M+4M**
**DURATION:2 hrs**

सूचना ः
1) सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.
2) प्रश्न लिहिण्याआधी प्रश्न कमांक लिहीणे आवश्यक आहे.
3) पेपर सुवाच्य अक्षरात लिहावा.

प्रश्न 1) पुढील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे योग्य पर्याय निवडून लिहा. (कोणतेही पाच) 5

कोठेही आग लागली , तर एक लाल रंगाची गाडी जोरजोरात घंटा वाजवत आगीच्या ठिकाणी येते. त्यातील कर्मचारी पाण्याच्या मोठमोठया नळकांडया घेऊन आग आटोक्यात आणतात. आग विझवतात. या दलातील कर्मचा-यांच्या हालचाली खूप वेगवान व शिस्तबद्ध असतात. आग विझवण्याचे हे प्रात्यक्षिक बघण्यासारखे असते. आग लागणे , घर पडणे , झाड पडणे , मोठा अपघात होणे अशा आपत्कालीन परिस्थितीतून आपल्याला बाहेर काढण्याचे काम अग्निशमन दल करते. या दलास पाचारण करण्यासाठी 101 या करमुक्त दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधतात व आपात्कालीन घटना घडलेल्या ठिकाणचा पत्ता व थोडक्यात तपशील देतात. अग्निशमन दल घटनास्थळी तात्काळ पोहचते. आपल्याला मदत करण्यासाठी आलेल्या या कर्मचा-यांना आपण सहकार्य केले पाहिजे. ते देत असलेल्या सूचनांनुसार वागले पाहिजे.त्यांच्या कामात व्यत्यय येणार नाही , असे आवर्जून पाहिले पाहिजे , कारण ' अग्निशमन दल ' हा आपला मित्र आहे.

प्रश्न ः

1) आग लागल्यावर कोणती गाडी जोरजोरात घंटा वाजवत येते ?
अ) रंगीत गाडी ब) लाल रंगाची गाडी क) मोठी गाडी ड) पाण्याची गाडी

2) आपत्कालीन परिस्थितीतून आपल्याला बाहेर काढण्याचे काम कोण करते ?
अ) समाजसेवक ब) राजकीय दल क) अग्निशमन दल ड) नागरीक

3) दलातील कर्मचा-यांच्या हालचाली कशा असतात ?
अ) वेगवान ब) सावकाश क) भरभर ड) जोरात

4) या दलास पाचारण करण्यासाठी कोणत्या करमुक्त दूरध्वनी कमांकावर संपर्क साधतात ?
अ) 100 ब) 500 क) 101 ड) 000

5) अग्निशमन दल घटनास्थळी कधी पोहचते ?
अ) लवकरच ब) आरामात क) लगेच ड) तात्काळ

6) ' अग्निशमन दल ' हा आपला कोण आहे ?
अ) मित्र ब) सहकारी क) समाजसेवक ड) कर्मचारी

7) ' मित्र ' या शब्दाचा पुढीलपैकी योग्य विरूद्धार्थी शब्द कोणता ?
अ) शत्रू ब) सोबती क) सखा ड) मैत्रीण

8) वरील उता-याला उचित शीर्षक दया .

प्रश्न 2) पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. 4

1) शाळेचा पहिला दिवस 2) माझे कुटुंब 3) माझा आवडता सण

प्रश्न 3) पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. 4

1) आजारी असल्याने शाळेत येऊ शकत नसल्याबद्दल कळविणारे पत्र आपल्या वर्गशिक्षकांना लिहा.

2) सुट्टीत गावाला येत असल्याची सूचना देणारे पत्र आजीला लिहा.

प्रश्न 4 अ) चौकटी पूर्ण करा. 3

1) धोतर देणारी -

2) श्यामची हकिकत ऐकून कोणाला गहिवर आला -

3) गडाच्या पायथ्याशी काय वाहत होते -

4) पाखरे काय टिपतात -

5) झाडे कशाने लदबदलेली असतात -

6) गंधवती कोणाला दिलेले विशेषण आहे -

प्रश्न ब) आकृती पूर्ण करा. 5

1) अभयारण्यातील एक पक्षी -

2) धाकटया भावाविषयी बंधुप्रेम असणारा -

3) रानात पिकणा-या फळांना म्हणतात -

4) कवीच्या अंगणात पडते -

5) कोटसाठी हट्ट धरणारा -

प्रश्न 5 अ) पुढील प्रश्नांची एक - दोन वाक्यांत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन ) 4

1) पाखरे दाणे टिपण्यासाठी कुठे येतात ?

2) आग विझवण्यासाठी गोपाळने कोण कोणते प्रयत्न केले ?

3) माळढोक पक्ष्याविषयी माहिती तुमच्या शब्दात लिहा.

प्रश्न ब) पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. 6

1) विदयार्थ्यांच्या मनात सहलीला जाण्याविषयी कुतूहल का निर्माण झाले ?

2) श्याम ज्यांच्या घरी राहायचा त्यांनी जाऊ नको असे का म्हटले ?

3) मातीचा एक रम्य सुंदर गंध येतो कधी व का ते लिहा .

क ) कारणे लिहा . 2

1) आईला गहिवर आला ........................

2) गाडी थांबवा असे गोपाळ ओरडला ..................

ड) खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा. (मुक्तोत्तरी प्रश्न) 2

1) तुम्ही आजारी पडता तेव्हा घरातील सदस्य तुमची काळजी कशाप्रकारे घेतात ,ते तुमच्या शब्दांत लिहा.

किंवा

2) तुम्हाला गोपाळचे शौर्य पाठातून काय शिकण्यासारखे आहे असे वाटले ? का ते लिहा.

प्रश्न 6 अ) समानार्थी शब्द लिहा. 2

1) ढग - 2) सरिता - 3)वर्षा - 4) धरणी-

ब) विरूदधार्थी शब्द लिहा. 2

1) कडू - 2) दुःख - 3)मोठी - 4) वाईट-

क) वचन बदला. 2

1) झाड - 2) पेढा- 3)दवाखाने - 4) घरे -

ड) लिंग बदला. 2

1) काका- 2) मामी - 3) लेखिका - 4) डवी -

प्रश्न 7) पुढील प्रश्नांची उत्तरे कंसातील सूचनेनुसार लिहा. 5

1) तो काल खूपच रागातच होता. ( वाक्यातील सर्वनाम ओळखा )
2) आकाश शाळेजवळ उभा होता. ( वाक्यातील शब्दयोगी अव्यय ओळखा )
3) व्वा ! किती सुंदर साडी आहे . ( वाक्यातील केवलप्रयोगी अव्यय ओळखा )
4) समीरने आशाला खूपदा बजावले . ( क्रियाविशेषण अव्यय ओळखा )
5) सदानंद रडतच घरी आला . ( नाम ओळखा )

प्रश्न 8) तुमच्या शहरातील वीज पुरवठा बंद राहील याचे परिसरातील नागरिकांना आवाहन करणारा सूचनाफलक तयार करा . 2

*********************************************************************

## BONUS READING 4

1) गोष्टीतून तुम्ही काय शिकलात ?
2) कथेतील एका विदयार्थी कोणत्या वर्गात शिकत होते ?
3) देसाई सर शाळेत कोण होते ?
4) सूरात......... मिसळला नाही तर ? गोष्टीचे नाव पूर्ण करा.